स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)
राज्यातील शहरांमधील "उघडयावर शौच करण्याची प्रथा बंद करून शहरे हागंदारी मुक्त करण्यासंदर्भात कार्यान्वयन सुचना

महाराष्ट्र शासन
स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालय
नगर विकास विभाग
व्दारा मुइन्फ्रा,तळ मजला, सीआर.2,
बॅ.रजनी पटेल रोड, नरीमनपॉईट, मुंबई 400 021
परिपत्रक क्र. राअसं/कार्यान्वयनसूचना/ ५२ /15-16
दिनांक: 28 जुलै 2015

संदर्भ : (1) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी)च्या डिसेंबर, 2014 मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.
(2) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वभाअ 2015/प्र.क्र.23/नवि-34, दिनांक 24 एप्रिल, 2015
(3) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वभाअ 2015/प्र.क्र.23/नवि-34, दिनांक 15 मे, 2015
(4) शासन पत्र, नगर विकास विभाग, क्रमांक स्वभाअ 2015/संक्र 863 /नवि-34, दिनांक 9 जून, 2015
(5) केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाचे पत्र क्रमांक12/27/2015-SBM दिनांक 10 जून, 2015
(6) शासन पत्र, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ 2015/संक्र872/नवि-34, दिनांक 1 जुलै, 2015

परिपत्रक:

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) हे एक अभियान म्हणून राबविण्यास संदर्भिय क्रमांक 3 येथील शासन निर्णयान्वये मान्यता देवून या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील महसूली विभागांतर्गत येणाऱ्या महानगरपालिकांचे महापौर व आयुक्त तसेच नगरपालिका / नगरपंचायतीचे नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांची एक दिवसाची कार्यशाळा व त्या विभागाचा संकल्प स्वच्छतेचा कार्यक्रम मा. मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत होत आहे. या कार्यशाळांमध्ये उपस्थित महापौर, नगराध्यक्ष, आयुक्त व मुख्याधिकारी यांनी मांडलेली मते / अडचणींचा तसेच केंद्र शासनाने या अभियानाच्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचना विचारात घेवून स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या (नागरी) अंमलबजावणीसाठी सूलभता येण्याच्या दृष्टीने पुढील प्रमाणे सविस्तर सूचना देण्यात येत आहेत.

2. **उद्दिष्ट :**

2.1 शहरांमधील ज्या कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने ती कुटुंबे उघडयावर शौचास जात आहेत अशा कुटुंबांना वैयक्तीक घरगुती शौचालय अथवा सामुदायीक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणे.

2.2 शहरांमधील सार्वजनिक ठिकाणे उदा. बाजार, रेल्वे स्थानके, बस स्थानके, पर्यटन स्थळे, कार्यालय संकुल इत्यादी ठिकाणी पुरेशा संख्येने सार्वजनिक शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देणे.

2.3 नविन ईन-सॅनिटरी शौचालये शहरात होवू न देणे व अस्तित्वातील ईन-सॅनिटरी शौचालयांचे सॅनिटरी शौचालयामध्ये रूपांतर करणे.

2.4 अशा प्रकारे शहरामधील प्रत्येक कुटुंबाला शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देवून शहर हगंदारी मुक्त करणे.

2.5 यासाठी सन 2011 च्या जनगणनेतील उघडयावर शौचालयास जात असलेल्या कुटूंबांची आकडेवारी आधारभूत धरणे.

3. **शहरस्तरावर प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्थापन करणे:**

3.1 सर्व शहरांमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र "प्रकल्प अंमलबजावणी कक्ष" (PIU) स्थापन करण्यात यावा. मोठया शहरांमध्ये असा कक्ष वार्ड स्तरावरही स्थापन करता यईल.

3.2 सदर कक्ष हा आयुक्त, महानगरपालिका / मुख्याधिकारी, नगरपरिषद यांच्या थेट नियंत्रणाखाली असावा.

3.3 या प्रकल्प अंमलबजावणी कक्षाचे प्रमुख म्हणून उपआयुक्त / सहायक आयुक्त / उपमुख्याधिकारी / कार्यालयीन अधिक्षक यांना करून त्यांच्या अंतर्गत उपअभियंता / नगरअभियंता / लेखापाल /स्वच्छता निरिक्षक/ कर निरीक्षक / संगणक चालक इत्यादी इतर योग्य अशा अधिकाऱ्यांचा समावेश असावा.

3.4 प्रकल्प अंमलबजावणी कक्षासाठी येणारा खर्च ( अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते वगळून) क्षमता बांधणी आणि प्रशासकीय व कार्यालयीन खर्च या बाबीसाठी शहरस्तरावर खर्च करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

4. **प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने करावयाच्या कार्यवाहीचे टप्पे :**

i) सर्वेक्षण. ii) माहितीचे संकलन. iii) अंमलबजावणीचा कृती आराखडा तयार करणे. iv) जनजागृती. v) अर्ज मागविणे. vi) स्थळ निरिक्षण. vii) अर्ज मंजुरी व अनुदानाचा पहिला हप्ता वितरण viii) शौचालय बांधकामाचे नमुने. ix) शौचालय बांधकाम पर्यवेक्षण. x) पुर्णत्व अहवाल व अनुदानाच्या अंतीम हप्त्याचे वितरण. xi) केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर शहराची माहिती भरणे व अर्ज अपलोड करणे. xii) प्रगती अहवाल पाठविणे.

5. **सर्वेक्षण:**

5.1 शासन पत्र, नगर विकास विभाग क्र. स्वमअ-2015/सं.क्र.872/नवि-34 दिनांक 1 जुलै 2015 अन्वये दिलेल्या सुचनांनुसार दिनांक 4 जुलै 2015 रोजी शाळाबाहय बालकांच्या सर्वेक्षणा सोबत शौचालयाच्या उपलब्धतेचे सर्वेक्षण (*जोडपत्र-1*) करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, सर्व शहरांमध्ये दिनांक 4 जुलै, 2015 रोजी अथवा त्यानंतर शौचालय उपलब्धतेचे सर्वेक्षण करणे अपेक्षित होते. असे सर्वेक्षण अद्याप करण्यात आले नसल्यास ते दिनांक 31 जुलै, 2015 पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करून घेण्यात यावे.

5.2 सन 2011 च्या जनगणनेतील उघडयावर शौचालयास जात असलेल्या कुटूंबांची आकडेवारी आधारभूत धरण्यात यावी. ( सन 2011 च्या जनगणने मध्ये शहरामधील एकूण कुटुंब संख्या, त्यापैकी शौचालयांची सुविधा उपलब्ध असलेली कुटुंब संख्या व शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या कुटुबांची संख्या देण्यात आली आहे. सदर माहिती http://www.censusindia.gov.in/DigitalLibrary/MFTableSeries.aspx या संकेतस्थळावरील पृष्ठ 5 मधील Tables 43 HH-8 Households by Availability of type of Latrine Facility Table For Maharashtra मध्ये उपलब्ध आहे.)

6. **माहितीचे संकलन :**

6.1 सर्वेक्षणातील माहितीच्या संकलनाचे काम प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने करावे.

6.2 ज्या कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने ते उघडयावर शौचास जातात अशा कुटुंबांची (सर्वेक्षणाकरीता विहित केलेल्या प्रपत्रातील अ.क्र.6 (क) मध्ये होय नमूद केलेल्या कुटुंबांची) यादी तयार करण्यात यावी.

6.3 अशा प्रकारे तयार करण्यात आलेली यादी ही अंतीम नसून यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात यावी.

6.4 सदर यादी सर्व जनतेच्या माहितीसाठी सार्वजनिक डोमेनवर उपलब्ध करून देण्यात यावी.

7. **अंमलबजावणीचा कृती आराखडा तयार करणे:**

7.1 या सर्वेक्षणात उघडयावर शौचास जाणाऱ्या कुटुंबांची जी आकडेवारी उपलब्ध झाली आहे त्या सर्व कुटुंबांना शौचालयाची सुविधा (वैयक्तीक अथवा सामुदायीक) उपलब्ध करून देण्याचा कृती आराखडा तयार करण्यात यावा.

7.2 सर्वेक्षणात उघडयावर शौचास जाणाऱ्या कुटुंबांची संख्या ही सन 2011 च्या जनगणनेमध्ये दर्शविण्यात आलेल्या उघडयावर शौचास जाणाऱ्या कुटुंब संख्येपेक्षा अधिक असल्यास आयुक्त व मुख्याधिकारी यांनी स्वत: ही कुटुंबसंख्या वाढण्यामागील कारणांची माहिती घेवून यादीची तपासणी करावी व त्यांनी यादी अंतीम करावी.

7.3 अशा प्रकारे त्यांनी अंतीम केलेल्या यादीमधील सर्व कुटुंबांना शौचालयाची सुविधा (वैयक्तीक अथवा सामुदायीक) उपलब्ध करून देण्याचा कृती आराखडा तयार करण्यात

यावा. परंतु, या शहरांनी या कृती आराखडयानुसार अंमलबजावणी करताना प्रथम सन 2011 च्या जनगणनेमधील आकडेवारीत दर्शविलेल्या संख्ये एवढया कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. उर्वरित कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासन वेगळयाने आदेश देईल.

7.4 वरील प्रमाणे शहर हगंदारी मुक्त करण्याचा कृती आराखडा तयार करताना शहरामधील उघडयावर शौचास जाणाऱ्या कुटुंबांची संख्या विचारात घेता शहर 2 ऑक्टोबर, 2015, 2 ऑक्टोबर, 2016, 2 ऑक्टोबर, 2017 व 2 ऑक्टोबर, 2018 यापैकी केंव्हा व कसे हगंदारी मुक्त केले जाईल याबाबतचे संपूर्ण नियोजन करण्यात यावे.

7.5 वरील प्रमाणे कृती आराखडा तयार करून तो शासनाकडे /स्वच्छ महाराष्ट्र संचालनालय दिनांक 31 जुलै, 2015 पर्यंत पाठविण्यात यावा.

8. **जनजागृती:**

8.1 शहरांमध्ये वरील प्रमाणे सर्वेक्षणाचे काम सुरू असतानाच शहरस्तावर माहिती, शिक्षण व प्रसार (IEC) कार्यक्रमांतर्गत शौचालयांच्या वापराबाबत व स्वच्छते विषयक व्यापक जनजागृती मोहीम हाती घेण्यात यावी.

8.2 प्रत्येक शहराने स्वच्छतेचे ब्रॅंड ॲम्बॅसिडर नेमावेत. तसेच स्वच्छता वार्डस्तरावर स्वच्छता दूतही नेमावेत.

8.3 स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी प्रत्येक शहरांने आपले फेसबुक पेज निर्माण करावे. तसेच टिवटर, व्हॉट्स ॲप, अश्या सामाजिक माध्यमाचा (social media) वापर करावा. शाळा व महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छते संदर्भात जागृती होण्यासाठी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे.

8.4 या जनजागृतीसाठी येणारा खर्च केंद्र व राज्य शासनाकडून माहिती, शिक्षण व प्रसार (IEC) याबाबीसाठी प्रत्येक शहरास उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या अनुदानातून त्यांनी भागवावयाचा आहे.

9. **अर्ज मागविणे:**

9.1 सर्वेक्षणात शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने उघडयावर शौचास जाणाऱ्या कुटुंबांची संख्या वरील प्रमाणे निश्चित झाल्यानंतर तयार करण्यात आलेल्या कृती आराखडयानुसार शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित लाभार्थी कुटुंबांकडून अर्ज मागविण्यात यावेत. अर्जाचा नमूना *जोडपत्र -2* म्हणून सोबत जोडला आहे. यामध्ये शहरस्तरावर आवश्यकतेनुसार बदल करण्याची मुभा आहे.

9.2 अर्ज मागविण्याची प्रक्रीय जो पर्यंत कृती आराखडयातील सर्व कुटुंबांकडून अर्ज प्राप्त होत नाहीत तोपर्यंत सुरू ठेवण्यात यावी.

9.3 प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर प्राप्त झालेले अर्जांचा प्राथम्यक्रम ठरवावा.

9.4 लाभार्थ्यास केंद्र शासनाच्या वेबसाईटवर परस्पर आपला अर्ज अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्याचाही लाभ घेण्याबाबत लाभार्थ्यांना प्रवृत करण्यात यावे.

9.5 जे अर्ज शहरस्तरावरील प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडे प्राप्त होतील ते अर्ज केंद्र शासनाच्या www.swachhbharaturban.gov.in वेबसाईटवर अपलोड करण्यात यावेत.

10. **स्थळ निरिक्षण :**

10.1 **प्राप्त अर्जांच्या प्राथम्यक्रमानुसार महानगरपालिकेच्या/ नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत संबंधित लाभार्थ्यांच्या घरी जावून प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात यावे. *(जोडपत्र -3)***

10.2 स्थळ निरीक्षण करताना कर्मचाऱ्यांमार्फत खालील मुददयांची पाहणी करणे अपेक्षित आहे.

i) <u>जागेची उपलब्धता</u> : वैयक्तीक घरगुती शौचालय बांधण्यास लाभार्थ्याकडे पुरेशी जागा उपलब्ध आहे किंवा नाही. लाभार्थ्याकडे वैयक्तीक घरगुती शौचालय बांधण्यास पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास त्या कुटुंबास सामुदायीक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जवळच (500 मीटर्सच्या आत मध्ये) जागा उपलब्ध आहे किंवा कसे?

ii) शौचालय बांधकामासाठी शासन अनुदाना व्यतीरीक्त उर्वरित रक्कम उपलब्ध करून देण्याची व खर्च करण्याची तयारी आहे काय ?

iii) हमीपत्र: संबंधित लाभार्थ्याने शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेतून शौचालय बांधकामासाठी अनुदान घेतले नसल्याबाबत व शौचालय बांधकाम विहित मुदतीत पूर्ण करून वापरात आणण्याबाबत हमीपत्र घेण्यात यावे. ( स्थानिक परिस्थितीनुरूप यामध्ये बदल करता येईल.)

11. **अर्ज मंजुरी व अनुदानाचा पहिला हप्ता वितरण:**

11.1 वरील प्रमाणे स्थळ निरीक्षण झाल्यानंतर अर्जदारास सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनंतर सोबतच्या *<u>जोडपत्र -4</u>* प्रमाणे मंजूरी कळविण्यात यावी.

11.2 सदर मंजूरी सोबतच केंद्र व राज्याच्या अनुदानाचा पहिला हप्ता (बृहन्मुंबईमध्ये रू 2500 व उर्वरित शहरांमध्ये रू 6000) लाभार्थी कुटुंबांच्या बँक खात्यात थेट वितरित करण्यात यावा. अनुदान वितरण करण्यात आल्यानंतर 7 दिवसात शौचलयाचे बांधकाम करण्याबाबत लाभार्थ्यास कळविण्यात यावे.

11.3 लाभार्थ्याच्या अर्जास मंजूरी कळवितानाच केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेल्या अर्जासही मान्यता (Approval) देण्यात यावी.

12. **शौचालय बांधकामाचे नमुने:**

12.1 वैयक्तीक घरगुती शौचालयांसाठीचे व सामुदायीक शौचालयाचे उपलब्ध विविध तांत्रिक पर्याय व त्यासाठीचा अंदाजित खर्च याचा तपशील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनां सोबत देण्यात आलेला आहे.

12.2 स्थानिक बाजारात शौचालय बांधकामाचे प्रिफॅब्रीकेटेड (Prefabricated) विविध पर्याय उपलब्ध आहेत. त्या उपलब्ध पर्यायांचा गुणात्मक दर्जा, टिकाऊपणा इत्यादी बाबीची तपासणी प्रकल्प अंमलबजावणी कक्षा मार्फत करून नंतरच लाभार्थ्यास त्याच्या वापराबाबत माहिती देण्यात यावी.

12.3 शहरामध्ये शौचालय बांधकाम करणाऱ्या व गुणात्मक कामाचा पुर्वानुभव असलेल्या संस्थांची यादी प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने तयार करून ती लाभार्थ्यास उपलब्ध करून देण्यात यावी.

12.4 शौचालय बांधकामासाठीचे हे सर्व उपलब्ध तांत्रिक पर्याय व संस्थांची यादी लाभार्थ्यांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात यावी. यामधून योग्य पर्याय निवडण्याचे स्वातंत्र लाभार्थ्यास असेल. हा पर्याय निवडण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने लाभार्थ्यास मदत करावी.

13. **शौचालय बांधकाम पर्यवेक्षण:**

13.1 लाभार्थ्याच्या अर्जास मंजूरी देवून अनुदानाचा प्रथम हप्ता वितरीत करण्यात आल्यानंतर लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाची प्रगतीची तपासणी दर 15 दिवसांनी उप अभियंता/ नगर अभियंता/स्वच्छता यांनी करावी व बांधकाम प्रगती अहवाल छायाचित्रासह कक्षाला सादर करावा.

13.2 कामाची प्रगती दिसत नसल्यास कक्षामार्फत काम त्वरीत सुरू करण्याबाबत सुचना देणेत याव्यात.

13.3 प्रगती पथावरील कामांपैकी ठरावीक कामांची पाहणी स्वतंत्र प्रकल्प तपासणी यंत्रणेमार्फत करण्यात यावी. यासाठी स्थानिक यंत्रणा जसे स्थानिक इंजनिअरींग / महाविद्यालय / तंत्र निकेतन इत्यादीचा वापर करता येईल.

14. **पुर्णत्व अहवाल व अनुदानाच्या अंतीम हप्त्याचे वितरण:**

14.1 **लाभार्थ्यांने वैयक्तीक घरगुती शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे कळविल्यावर** शौचालय बांधकामाची अंतिम तपासणी, स्थळ आधारित तंत्रज्ञानाने करण्यात यावी. (Location base technology) अर्जदार व शौचालयाचे बांधकाम यांचा भौगोलिक टॅग केलेला स्वयं साक्षांकित फोटो (Self attested geo-tagged photograph) काढण्यात यावा. सदर फोटो स्वच्छ भारत अभियान (नागरी) / स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या एम.आय.एस. वर अपलोड करण्यात यावा.

14.2 लाभार्थ्याचा भौगोलिक टॅग केलेला फोटो (geo-tagged photograph) घेण्यासाठी Android Base applications चा वापर करता येईल.

14.3 त्यानंतर व्दितीय टप्प्याचे अनुदान लाभार्थ्याच्या बँक खात्यात थेट वितरीत करण्यात यावे.

14.4 शौचालय बांधकाम पुर्ण झाल्यावर स्वच्छ भारत अभियानाचा लोगो व टॅगलाईन दर्शनी भागावर दर्शविण्यात यावा.

15. **केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर शहराची माहिती भरणे व अर्ज अपलोड करणे :**

15.1 केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियानासाठी https://swachhbharaturban.gov.in हे स्वतंत्र संकेतस्थळ सुरू केले आहे. या संकेतस्थळावर प्रत्येक शहरांची आपल्या शहराबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे.

15.2 केंद्र शासनाच्या या संकेतस्थळावर लॉग ईन करता यावे याकरीता प्रत्येक शहराचा युझर आयडी व पासवर्ड या नगर विकास विभागाचे आपणास कळविला आहे. त्याचा वापर करून सर्व शहरांनी केंद्र शासनाच्या या संकेतस्थळावरील आपली माहिती तात्काळ भरावयाची आहे.

15.3 सदर वेबसाईटवर लाभार्थी अर्जदार स्वत: अर्ज अपलोड करू शकतो.

15.4 प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडे प्राप्त झालेले अर्ज कक्षा मार्फतही अपलोड करता येतील. तसेच केंद्र शासनाने नागरीक सेवा केंद्रामधून ( CSC)( महा ई सेवा केंद्र) अर्ज अपलोड करण्यासाठीची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्याचाही उपयोग शहरस्तरावरून करून घेता येईल. या केंद्रा मार्फत अपलोड करण्यात येणाऱ्या अर्जासाठीची खर्च केंद्र शासन या केंद्रांना परस्पर उपलब्ध करून देणार आहे. केंद्र शासनाच्या दिनांक 6 जुलै, 2015 च्या पत्राची प्रत सोबत ***जोडपत्र -5*** म्हणून जोडली आहे.

15.5 ज्या शहरांमध्ये नागरीक सेवा केंद्र ( CSC) उपलब्ध नसतील तेथे नगरपालिका स्वत:च्या ईसेवा केंद्रा मार्फत असे अर्ज अपलोड करू शकतील.

16. **शौचालय बांधकामासाठी निधीची उपलब्धता:**

16.1 **वैयक्तीक घरगुती शौचालय बांधकामासाठी:**

(i) केंद्र व राज्य शासनाचे अनुदान: मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी रू 5000/- ( केंद्र 4000+ राज्य 1000) तर उर्वरित शहरांसाठी रू 12,000/-( केंद्र 4000+ राज्य 8000)

(ii) या व्यतीरिक्त संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने काही निधी यासाठी उपलब्ध करून देण्यात यावा.

(iii) लाभार्थ्यांने स्वत:चा सहभाग द्यावा.

(iv) शौचालय बांधकामासाठी लाभार्थ्यास वित्तीय संस्थांकडून कर्ज घेता येईल.

(v) मा. खासदारांचा स्थानिक विकास निधी, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) इत्यादी स्त्रोतामधून उपलब्ध करून घेता येईल.

16.2 **सामुदायीक शौचालय :**

(i) प्रत्येक सामुदायिक शौचालयाच्या युनिट करिता येणाऱ्या खर्चाच्या 40 टक्के अथवा व्यवहार्यता अंतर निधी (Viability gap funding) केंद्र शासन उपलब्ध करून देईल. हा निधी प्रती शौचालय सीट रू 26,000 एवढा असेल. तर, राज्य शासन केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या किमान 25 टक्के एवढा निधी उपलब्ध करून देईल. उर्वरित निधी इतर स्त्रोतांमधून उपलब्ध करून घेण्यात यावा.

(ii) मा. खासदारांचा स्थानिक विकास निधी, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) इत्यादी स्त्रोतामधून उपलब्ध करून घेता येईल.

(iii) या व्यतीरिक्त संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने काही निधी यासाठी उपलब्ध करून देण्यात यावा.

(iv) यामध्ये पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था असावी. लहान मुलांसाठी सुयोग्य व्यवस्था करण्यात यावी. सामुदायीक शौचालयाची व्यवस्था शक्यतो संबंधित कुटुंबाच्या घरापासून 500 मीटरच्या आत करण्यात यावी.

16.3 **सार्वजनिक शौचालय** :

(i) सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. यास्तव, सार्वजनिक शौचालये "सार्वजनिक खाजगी सहभाग" (PPP) पध्दतीने बांधण्यात यावीत. यामध्ये पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था असावी. लहान मुलांसाठी सुयोग्य व्यवस्था करण्यात यावी.

17. **शौचालय बांधकामासाठी जागेबाबत ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसणे.**

17.1 या योजनेमधील लाभार्थी अधिकृत / अनधिकृत वसाहतीमध्ये राहत असतील अथवा अधिसूचित केलेल्या / अधिसूचित न केलेल्या झोपडपट्टीमध्ये राहत असतील तरी त्यांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

17.2 पात्र लाभार्थी केंद्र /राज्य शासनाच्या कोणत्याही जागेवर राहत असेल तर त्यास शौचालय बांधकामासाठी शासनाच्या संबंधित विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही असे केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भीय क्रमांक 5 येथील दिनांक 10 जून, 2015 च्या पत्रान्वये कळविले आहे. केंद्र शासनाच्या दिनांक 10 जून, 2015 च्या पत्राची प्रत ***जोडपत्र -6*** म्हणून सोबत जोडली आहे.

17.3 शहर हागंदारी मुक्त करण्यासाठी या योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यास शौचालय उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने वरील प्रमाणे ना-हरकत प्रमाणापत्र न घेता शौचालय बाधकामास परवानगी देण्यात यावी. परंतु, अशा परवानगी मुळे संबंधित लाभार्थ्यास संबंधित जागेवरील वास्तव्याचे अथवा इतर कोणतेही कायदेशीर हक्क प्राप्त होणार नाहीत, तसे त्याच्या मंजूरी आदेशातही नमूद करण्यात यावे.

18. **अन्य सुचना:**

18.1 शेजारील दोन किंवा अधिक कुटुंबांना एकत्रितपणे सेफ्टीक टँक, बायो डायजेस्टर, बायो टँक बांधून वापरता येईल.

18.2 सध्याची इनसॅनिटरी वैयक्तीक शौचालये व इन सॅनिटरी सामुदायीक शौचालये अनुदानासाठी पात्र आहेत.

18.3 सामुदायीक शौचालय म्हणून फिरत्या शौचालयांचा (Mobile Toilet) वापर करता येईल.

18.4 वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम एकत्रितपणे कंत्राटदार / स्वंय सहायक गटामार्फत करून घेता येईल.

18.5 सार्वजनिक शौचालयाच्य सुविधेसाठी व्यक्तींना 1 कि.मी. पेक्षा ज़ास्त लांब जावे लागू नये.

18.6 शहरामंधील बांधकामे चालू असलेल्या ठिकाणी बांधकमांवरील मजूरांसाठी शौचालयाची सुविधी संबंधित ठेकेदाराने / विकासकाने उपलब्ध करून देण्यात यावी.

18.7 शासनाच्या इतर विभागाकडील योजनांचे एकत्रिकरण (Convergence) साधण्याचे काम प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने करावे.

18.8 शहरातील उघडयावर शौचाला जाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जागेचा वापर त्यासाठी पुन्हा होणार नाही याची दक्षता प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने घ्यावी.

18.9 शहरांमधील शाळा व महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांसाठी शौचालयाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित संस्थाना कळविण्यात यावे.

18.10 या अभियानाच्या अंमलबजावणीचे जिल्हास्तरावरील पर्यवेक्षण जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा प्रशासन अधिकारी (नपा शाखा) यांनी तर विभागीय स्तरावरील पर्यवेक्षण विभागीय आयुक्त कार्यालयातील विभागीय उपसंचालक (नपा शाखा) यांनी करावे. त्यांनी त्यांच्या जिल्हयामधील/ विभागामधील महानगरपालिका / नगरपालिकां मधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा मागील महिन्याचा एकत्रित अहवाल राज्य अभियान संचालनालयाकडे त्यापुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यंत पाठवावा.

18.11 शहरातील उघडयावर शौचालयास जाणाऱ्या सर्व कुटुंबाना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर, शहरातील सर्व ईन- सॅनिटरी शौचालयांचे सॅनिटरी शौचालयामध्ये रुपांतर केल्यावर तसेच, शहरातील तरंगती लोकसंख्या असलेल्या ठिकाणी पुरेशा संख्येने सार्वजनिक शौचालयांची सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर शहरात कोणतेही कुटुंब उघडयावर शौचास जात नाही याची खात्री करून घेवून शहर हागंदारी मुक्त झाल्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

18.12 शहर हागंदारी मुक्त झाल्याचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर सदर शहराची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करून त्याची खात्री करून घेण्यात येईल.

19. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी करताना उपरोक्त सूचनांचे पालन करण्यात यावे.

(समीर उन्हाळे)
राज्य अभियान संचालक,
स्वच्छ महाराष्ट्र अभियान

प्रति,

1) सचिव (नवि-2) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32
2) आयुक्त, तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
3) विभागीय आयुक्त (सर्व)
4) जिल्हाधिकारी (सर्व)
5) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
6) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
7) उप संचालक, नगर पालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
8) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)

परिशिष्ट-६

No. 12/27/2015-SBM
Government of India
Ministry of Urban Development
SBM Division

Dated 10th June, 2015

To

Secretary
Urban Development Department
Govt. of Maharashtra
Mantralaya, Mumbai 400032

Subject: Request for Clarification on NOC/Permissions required by the Urban Local Bodies from various Central Ministries.

Madam,

I am directed to refer to your D.O. No. SMM-2015/RR849/UD-34 dated 4th June, 2015 on the above subject and to say that as per SBM (Urban) Guidelines Para 4.3.2 for construction of Household toilets, beneficiary households will be targeted under this scheme irrespective of whether they live in authorized/unauthorized colonies or notified / non"-notified slums. Under SBM (Urban), tenure security issues are to be de-linked with benefits. It may be read that NOC is not required for construction of toilets.

Yours faithfully

(Signature)
(Shubha Thakur)
Director (SBM)
Tel:23062374

Copy for information to:-

1. Secretary, Ministry of Railway, Rail Bhawan, New Delhi
2. Secretary, Ministry of Shipping, Transport Bhawan, New Delhi
3. Secretary, Road Transport & Highways, Transport Bhawan, New Delhi
4. Secretary, Ministry of Environment, Forests and Climate Change, Paryavaran Bhawan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi
5. Secretary, Ministry of Civil Aviation, Rajiv Gandhi, Jor Bagh, New Delhi.
6. Secretary, Ministry of Culture, Shastri Bhawan, New Delhi

अनुलग्नक-16

प्रवीण प्रकाश, आई.ए.एस.
PRAVEEN PRAKASH, IAS
Joint Secretary & Mission Director (SBM)
संयुक्त सचिव एवं मिशन निदेशक (एस.बी.एम.)

Tel.: (011) 23062309; Mob. 9013133636
Fax: (011) 23062477
e-mail. praveen.prakash71@nic.in

सत्यमेव जयते

भारत सरकार
शहरी विकास मंत्रालय
निर्माण भवन, नई दिल्ली-110011

GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF URBAN DEVELOPMENT
NIRMAN BHAWAN, NEW DELHI-110011

नई दिल्ली—110011, तारीख 201
New Delhi - 110011, Dated the 201

D.O. No.9/3/2015

Dated 6th July, 2015

Dear Sir/Madam,

Under the Swachh Bharat Mission 1.4 crore individual household toilets are to be constructed. For this NIC unit of MoUD has developed an online workflow for receiving application for citizens/ULBs for the individual household latrines applications (IHHL) and upto geo tagging the final construction.

2. Keeping in view of mind that large number of beneficiaries do not have access to computers etc., therefore, this Ministry has come into Memorandum of Understanding with M/s. CSC e-Governance Services India Limited to undertake this task. M/s. CSC has almost one lakh common service centres (CSCs) across the country to help in this task.

3. The cost for the following task entrusted with CSC for each application will be borne by this Ministry:-

| Sl. | Name of Service | Transaction Cost (in Rs.) |
|---|---|---|
| 1. | Application form filling and submission to approving authority | 3 |
| 2. | 1 (one) Photo scanning and uploading | 5 |
| 3. | 1st page of passbook – scanning and uploading | 5 |
| 4. | Acknowledgement print/sanction letter | 2 |
| 5. | 1 geo tagged photograph uploading of final work | 5 |
| | Total cost per beneficiary | 20 |

4. I request you kindly get the benefits of services of CSC e-Governance Services India Limited for filling applications for Individual Household Toilets and right upto geo tagging of the final construction. List of CSC nodal officers is enclosed.

Yours sincerely,

(Praveen Prakash)

Pr. Secretary (UD)
State Govts./UTs

Copy to:-

Chief Executive Officer, CSC e-Governance Services India Limited

## जोडपत्र-4

### स्वच्छ महाराष्ट्र अभियान
### वैयक्तीक घरगुती शौचालय बांधकामास मंजूरी देणारा आदेश

प्रति,
श्री/श्रीमती ____________
_______________

विषय :- वैयक्तीक शौचालय मंजुरीबाबत.
संदर्भ : - आपला अर्ज क्रमांक दिनांक

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भीय अर्जाच्या अनुषंगाने कळविणेत येते की, आपण या कार्यालयास सादर केलेल्या वैयक्तीक शौचालयासाठीच्या अर्ज व कागदपत्रानुसार मनपा / नपा च्या प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत आपण शौचालय बांधण्याकरीता सुचविलेल्या जागेची पाहणी करण्यात आली असून ती पर्याप्त व योग्य असल्याचे आढळून आली असल्याने स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या अर्जास मंजुरी प्रदान करणेत येत आहे.

2. स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत शहरे हागंदारी मुक्त करण्यासाठी या योजनेचे आपण पात्र लाभार्थी असल्याने आपणास शौचालय उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने आपणास शौचालय बाधकामास परवानगी देण्यात येत आहे. परंतु, अशा परवानगी मुळे आपणास संबंधित जागेवरील वास्तव्याचे कोणतेही कायदेशीर हक्क प्राप्त होणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी.

3. सदर मंजूरी सोबत केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाचा पहिला हप्ता मंजूर करण्यात येत आहे. सदर पहिला हप्त्याचा निधी आपल्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

4. सदर मंजूरी आदेश मिळाल्या पासून 7 दिवसांच्या आत आपण शौचालय बांधकामास सुरवात करण्यात यावी. तसेच, शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर अनुदानाच्या अंतीम हप्त्याची मागणी करण्यात यावी.

5. शौचालयाचे बांधकाम सुरू असताना मनपा/नपा च्या अधिकाऱ्यांमार्फत त्याची तपासणी करण्यात येईल त्यावेळी त्यांना योग्य सहकार्य करण्यात यावे.

सक्षम प्राधिकारी

## जोडपत्र-1

## प्रपत्र

## स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत वैयक्तिक शौचालय उपलब्धता सर्वेक्षण

------------------- महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपंचायत

वार्ड क्रमांक ------------------

| | | |
|---|---|---|
| 1 | कुटुंबप्रमुखाचे नाव | |
| 2 | कुटुंबप्रमुखाचा राहण्याचा पत्ता (मालमत्ता क्रमांकासह) | |
| 3 | कुटुंबप्रमुखाचा आधार कार्ड क्रमांक | |
| 4 | कुटुंबप्रमुखाचा मोबाईल क्रमांक | |
| 5 | घरामध्ये वैयक्तिक शौचालय आहे का ? | होय / नाही |
| 6 | घरामध्ये वैयक्तिक शौचालय नसल्यास खालील पैकी कोणत्या शौचालय पद्धतीचा वापर चालू आहे. | |
| | (अ) दोन किंवा अधिक कुटुंबांचा वापर (ग्रुप शौचालय) | होय / नाही |
| | (ब) वस्ती पातळीवरील शौचालय / सार्वजनिक शौचालय | होय / नाही |
| | (क) उघड्यावर शौचास जाण्याची पद्धत अवलंबता का ? | होय / नाही |

सर्वेक्षण अधिकाऱ्याचे नाव,
पदनाम, स्वाक्षरी व दिनांक

कुटुंबप्रमुखाची स्वाक्षरी
व दिनांक

# जोडपत्र-2

## स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत
## वैयक्तीक शौचालयासाठी अर्ज

| अर्जदाराचा फोटो |
|---|

**वैयक्तिक माहिती**

अर्जदाराचे संपूर्ण नांव* ____________________

वडीलांचे / पतीचे नांव* ____________________

1) लिंग ____________________

2) मोबाईल क्र. ____________________

3) ईमेल ____________________

4) पत्ता* ____________________

5) वार्ड क्र. / प्रभाग क्र. ____________________

6) सद्यस्थिती शौचालय वापर*: सार्वजनिक / सामुदायीक / ईन-सॅनिटरी शौचालय / उघडयावर

7) ओळखपत्र* (कोणतेही एक)

i) आधार कार्ड नंबर ____________________

ii) इलेक्शन कार्ड नंबर ____________________

iii) पॅन कार्ड नंबर ____________________

vi) इतर शसकीय कार्ड ____________________

8) बँक खात्याचे विवरण*

बँकेचे नाव ____________________

बँक कोणत्या शहरात आहे ____________________

बँक शाखेचे नाव ____________________

आयएफएससी कोड ____________________

अर्जदाराचा बँक खाते क्र.____________________

(बँक पासबूकच्या प्रथम पानाची झेरॉक्स प्रत जोडावी)

9) शौचालय बांधकामासाठी शासकीय अनुदानापेक्षा लागणारा अधिकचा निधी स्वत: भरण्यास तयार आहे.

अर्जदारची सही व दिनांक

टिप - * चिन्ह असलेल्या बाबी आवश्यक असल्याने त्या पुर्ण भरून घ्याव्यात.

# जोडपत्र-3

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान
## वैयक्तीक शौचालय योजना
## स्थळ निरिक्षण अहवाल

1) अर्जदाराचे नाव ____________________

2) अर्जदाराचा पत्ता ____________________

____________________

____________________

3) शौचालय बाबत निरिक्षण

i) वैयक्तीक शौचालय ☐ आहे ☐ नाही

ii) वैयक्तीक शौचालय असल्यास प्रकार :

बिना सेप्टिक टँक : ☐

एक टाक्याचे शौचालय : ☐

इन-सॅनिटरी : ☐

4) वैयक्तीक शौचालय नसल्यास अर्जदार शौचालयासाठीचा वापर :

सार्वजनिक शौचालय : ☐

खुल्या जागेत: ☐

5) वैयक्तीक घरगुती शौचालय बांधण्यासाठी घरात / घराजवळ पुरेशी जागेची उपलब्धता: आहे/नाही

6) नसल्यास, सामुदायीक शौचालय बांधकामासाठी जवळ ( 500 मीटर परिघात ) जागेची उपलब्धता:

आहे / नाही

6) शौचालय बांधावयाचे स्थान :

7) अभियंता यांचा अभिप्राय :

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________

दिनांक :

स्थळ :

अर्जदाराची स्वाक्षरी

अभियंता यांची स्वाक्षरी